# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:21.05.2025** **वार:बुधवार**

1. राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत नवीन गृह बांधणी धोरण जाहीर, विविध जिल्ह्यांतल्या सिंचन प्रकल्पांच्या सुधारित खर्चाला मान्यता
2. भारत लवकरच जगातली प्रथम क्रमांकाची स्टार्ट अप परिसंस्था बनेल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास
3. जागतिक कीर्तीचे खगोल शास्त्रज्ञ डॉक्टर जयंत नारळीकर यांचं निधन आणि
4. राज्यातल्या अनेक जिल्ह्यांत मुसळधार वृष्टी; घरांचं, वाहनांचं नुकसान

**मंत्रीमंडळ निर्णय**

राज्य मंत्रीमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत माझं घर माझं अधिकार या ब्रीदवाक्याला अनुसरुन, नवीन गृहबांधणी धोरण जाहीर करण्यात आलं. या धोरणाअंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन आणि पुनर्विकास करण्यात येणार आहे. अल्प उत्पन्न गटातील नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला, कामगार आणि विद्यार्थ्यांना या नवीन धोरणात प्राधान्य दिलं जाणार असून, या योजनेत सुमारे 70 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होण्याची अपेक्षा आहे.

सिंचनासाठीच्या पायाभूत सुविधांना चालना देण्यासाठी मंत्रीमंडळानं धुळे, सिंधुदुर्ग आणि रायगड जिल्ह्यातल्या सिंचन प्रकल्पांच्या सुधारित खर्चाला मंजूरी दिली. वाशिम जिल्ह्यातल्या कारंजा इथं वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापन करण्याला आणि त्यासंदर्भातील आवश्यक पूर्ततांसाठीच्या खर्चाला, मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. उद्योग विभागाचा धोरण कालावधी संपुष्टात आल्यानं प्रलंबित असलेल्या 325 प्रस्तावांना मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. यामुळे एक लाख कोटीपेक्षा जास्त गुंतवणूक आणि मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

सहकाराशी निगडीत नागरिकांच्या सोयीसाठी ई-क्युजे प्रणालीचं लोकार्पण मंत्रिमंडळ बैठकीदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं. सहकार विभागानं विकसित केलेल्या या प्रणालीमुळे जनतेला जलद तसंच पारदर्शक पद्धतीनं, सहकार विभागाची अर्धन्यायिक निर्णय प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीनं उपलब्ध होणार आहे.

**मुख्यमंत्री-सीएसआयआर**

स्टार्टअप क्षेत्रातल्या युवा पिढीच्या योगदानामुळे भारत लवकरच चीनला मागे टाकून सर्वाधिक वेगानं विकसित होणारी स्टार्ट अप परिसंस्था बनेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. विज्ञान आणि औद्योगिक संशोधन मंडळ अर्थात सी एस आय आर तर्फे आयोजित स्टार्ट अप परिषदेत ते काल मुंबईत बोलत होते. महाराष्ट्र ही भारताची स्टार्ट अप राजधानी म्हणून उदयाला येत असल्याचं त्यांनी सांगितलं. प्रत्येक नवीन संकल्पनेचं कार्यक्षमता, जीवनमानातील सुलभता आणि शाश्वतता या तीन निकषांवर मूल्यांकन करा असं फडणवीस म्हणाले.

केंद्रिय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंग या कार्यक्रमाला उपस्थित होते. उद्योजक बनण्यासाठी वयाची कुठलीही मर्यादा नाही असं सांगून स्टार्ट अपसाठी सुरू केलेल्या विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्याचं आवाहन त्यांनी केलं. राज्याचे कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आमि नवोन्मेष मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्यासह अन्य मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<u>तिरंगारॅली</u>**

ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर भारतीय सैन्याच्या शौर्याच्या सन्मानार्थ आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी राज्यात ठिकठिकाणी तिरंगा रॅली आयोजित केली जात आहे. काल बुलडाणा जिल्ह्यात तसंच सातारा जिल्ह्यात काढलेल्या तिरंगा यात्रेत सर्व स्तरातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. भारतीय सैन्याच्या शौर्याविषयी अभिमान व्यक्त करताना विशाल मुणगेकर म्हणाले......

**ऑपरेशन सिंधूरच्या यशामुळे प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटला आहे. आपल्या सैनिकांनी दाखवलेलं शौर्य आणि पराक्रम खरोखरच कौतुकास्पद आहे. सध्याची भारत पाक तणावपूर्ण परिस्थिती निश्चितच चिंताजनक आहे. पण मला खात्री आहे की आपले सैनिक देशाचे संरक्षण करण्यासाठी, सज्ज आहे सैनिकांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी अनेक माध्यमांद्वारे मी सैनिकांच्या युद्ध गाथा, पराक्रमाच्या गाथा लोकांपर्यंत पोहचवू शकतो. मला विश्वास आहे की आपल्या सैनिकांच्या शौर्यावर आणि आपल्या एकतेच्या बळावर आपण या परिस्थितीत नक्कीच यशस्वी होऊ जय हिंद.**

नारळीकर-निधन

जागतिक कीर्तीचे खगोल शास्त्रज्ञ डॉक्टर जयंत विष्णू नारळीकर यांचं काल पुण्यात वृद्धापकाळानं निधन झालं. ते 86 वर्षांचे होते. विज्ञान आणि प्रामुख्यानं खगोलशास्त्र या विषयात डॉ. नारळीकर यांनी बहुमोल कार्य केलं. पुण्यातल्या आयुकाची स्थापना करून त्यांनी खगोल शास्त्र विषयातील संशोधनाला चालना दिली. भारत सरकारनं पद्मभूषण, आणि पद्मविभूषण सन्मान देऊन त्यांचा गौरव केला. केवळ संशोधन क्षेत्रात कार्यरत न राहता त्यांनी लेखनाच्या माध्यमातून विज्ञानवादाचा प्रसारही केला. वैज्ञानिक विषयावरील विविध लेखांबरोबरच त्यांनी लिहिलेल्या विज्ञान कथाही खूप गाजल्या. अंतराळातील भस्मासुर, अंतराळ आणि विज्ञान, आकाशाशी जडले नाते, सूर्याचा प्रकोप ही त्यांची काही गाजलेली पुस्तकं. 94 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं अध्यक्षपदही डॉक्टर नारळीकर यांनी भूषवलं होतं. डॉक्टर नारळीकर यांच्याविषयीच्या आपल्या भावना व्यक्त करताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर रघुनाथ माशेलकर म्हणाले.....

**आज भारतीय विज्ञान विषयातील एक तेजस्वी तारा कायमचा नजरेआड झाला आहे असं मला वाटतं कारण ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ विचारवंत विज्ञान प्रसारक डॉक्टर जयंत नारळीकर यांच्या निधनाने माझ्या मते तर एक युग संपला आहे आणि सर फ्रेड ऑयल यांच्याबरोबर मांडलेला ऑल नार्डीकर सिद्धांत हा केवळ गणिती कल्पनेचा पराकर्ष नव्हता तो ब्रह्मांडाच्या उत्पत्ती विषयाच्या विचारांना एक भारसी वैकल्पिक दिशा देणारा होता पण माझ्यामध्ये त्यांचं मोठं कार्य त्यांनी विज्ञान सामान्य माणसापर्यंत त्यांच्या हृदयापर्यंत पोहोचवून केलं त्यांच्या लेखनाने व्याख्यानाने दूरदर्शन मालिकांनी लाखो विद्यार्थी नागरिक विज्ञानाच्या प्रेमात पडले ते केवळ वैज्ञानिक नव्हते ते विज्ञानाचे तत्वज्ञ होते माझे ते घनिष्ठ मित्र होते बरं का जवळचा असा आमचा संबंध आहे पन्नास वर्षांपूर्वी मी परत आलो भारतामध्ये आणि त्यावेळी ताराताई भोले यांचा आशीर्वाद घेण्यासाठी मी त्यांच्या घरी गेलो होतो तर त्यांनी मला आशीर्वाद काय दिला माहिती आहे का मोठा हो जयंत नारळीकर हो म्हणजे त्यांच्या मते जयंत नारळीकर हे सर्वोत्कृष्ट सायंटिस्टचं मापदंड होतं आणि माझ्या मते ते तसंच राहील मला असं वाटतं की आज ते आपल्यात नाहीत पण त्यांचा कल्पनांचा जो प्रकाश आहे तो अजूनही आकाशगंगेच्या पल्ल्यावर झळकत राहील त्यांना कृतज्ञतेने प्रेमाने आणि अभिमानाने मी अंतिम परिणाम करतो**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अन्य केंद्रिय मंत्र्यांनी नारळीकरांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. नारळीकरांचं काम भविष्यातल्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील असं राष्ट्रपतींनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. युवा पिढीच्या संशोधक वृत्तीला प्रोत्साहन देऊन त्यांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची उभारणी करण्यामध्ये नारळीकर यांचं मोलाचं योगदान आहे असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आणि एकनाथ शिंदे यांनी नारळीकर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रचार प्रसार करण्याचं भरीव कार्य नारळीकर यांनी

केलं. डॉ. जयंत नारळीकर यांच्या निधनामुळे भारतीय वैज्ञानिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे असं या सर्वांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

**<u>स्लॅब कोसळली-ठाणे</u>**

कल्याणमध्ये काल एका रहिवासी इमारतीचा स्लॅब कोसळून झालेल्या दुर्घटनेत एका लहान मुलासह सहा जणांचा मृत्यू झाला, तर पाच जण जखमी झाले. धोकादायक असलेल्या या इमारतीच्या चौथ्या मजल्याचा स्लॅब कोसळून ही दुर्घटना झाल्याची माहिती कल्याणचे उपविभागीय अधिकारी विश्वास गुजर यांनी दिली. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या पाच जणांना अग्निशमन दलानं बाहेर काढलं. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. इमारत धोकादायक झाल्यानं त्यातील रहिवाशांना महापालिकेनं नोटीस बजावली होती.

**<u>पाऊस</u>**

राज्यात काल अनेक ठिकाणी वीजा आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह मुसळधार पाऊस पडला. पुणे, सातारा आणि रत्नागिरी जिल्ह्यात मुसळधार पाऊस झाला. पुणे शहरात पावसामुळे होर्डिंग कोसळून काही दुचाकींचं नुकसान झालं.

कोल्हापूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी घरांचे पत्रे उडाले. सखल भागात सर्वत्र पाणी साचलं होतं. सिंधुदुर्ग जिल्ह्यात झालेल्या पावसामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला. पावसामुळे आंबा आणि कोकम पिकांचं मात्र नुकसान झालं आहे. सांगली जिल्ह्यात वादळी वाऱ्यांमुळे अनेक ठिकाणचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला. बुलडाणा जिल्ह्यात वाऱ्यांमुळे घरांचे पत्रे उडाल्यानं घरांचं आणि अन्नधान्याचं नुकसान झालं.

रत्नागिरी आणि संगमेश्वर तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसानं अनेक ठिकाणी बराच काळ वीजपुरवठा खंडित झाला होता. कोकण रेल्वेमार्गावर दरड कोसळल्यामुळे लांजा तालुक्यातल्या विलवडे स्थानकाजवळ सुमारे अडीच तास वाहतूक थांबवण्यात आली होती. थांबवलेल्या रेल्वेगाड्या रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास मार्गस्थ करण्यात आल्याची माहिती कोकण रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी सचिन देसाई यांनी दिली.

**<u>हवामान</u>**

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात आज बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी मेघगर्जना, सोसाट्याच्या वाऱ्यांसह जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडेल. तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.